19 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘गुरू-शिष्य’ कला प्रदर्शनास प्रतिसाद



**कोल्हापूर : प्रतिनिधी**


रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या रौप्यमहोत्सवी स्मृतिदिनानिमित्त आयोजित ‘गुरू-शिष्य’ कला प्रदर्शनास सर्वच स्तरांतील रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. शाहू स्मारक भवनच्या कलादालनामध्ये हे प्रदर्शन दि. २१ पर्यंत सर्वांसाठी खुले आहे.

‘गुरू-शिष्य’ प्रदर्शनाची ओढ शहरासह जिल्ह्यातील कलाविद्यार्थी, रसिकांना लागलेली असते. यावर्षीचे वेगळेपण म्हणजे शाहू स्मारक भवन येथील कलादालनचे बदललेले रूप. गुरू-शिष्य प्रदर्शनाच्या निमित्ताने कलादालनातील विद्युत व्यवस्था नव्याने बसवण्यात आली. याशिवाय पूर्ण कलादालनातील भिंतीवरील जाळीच्या पॅनेलला राखाडी रंगाच्या कपड्याने आच्छादित केले आहे. या नव्या रचनेमुळे चित्र पाहण्याचा एक वेगळाच आनंद रसिकांना मिळत आहे. प्रदर्शनात विजय टिपुगडे, अजेय दळवी, विलास बकरे, विद्या बकरे, शिवाजी मस्के, मनोज दरेकर, संतोष पोवार, नागेश हंकारे, बबन माने, अभिजित कांबळे, प्रवीण वाघमारे, गजेंद्र वाघमारे, शैलेश राऊत, किशोर राठोड, प्रकाश मोहिते, राहुल रेपे, पूनम राऊत, सर्वेश देवरुखकर, विजय उपाध्ये, आरिफ तांबोळी, नवज्योत काळे, विवेक कवाळे, पुष्कराज मेस्त्री, शुभम कुंभार, सुदर्शन वंडकर, केदार पोवार यांच्या कलाकृतींचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2025
पुढारी

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी डॉ. नितीन सोनजे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांच्याकडे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे. त्यांनी प्राचार्यपदाचा अतिरिक्त कार्यभार प्रा. डॉ. एस. के. पाटील यांच्याकडून स्वीकारला.

कॅप्टन डॉ. सोनजे यांनी भारतीय सैन्य दलाच्या अभियांत्रिकी विभागात काम केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या उपकुलसचिव आणि सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. गडचिरोली व मिरजच्या शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

19 MAR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्याशाखीय अभ्यासातून समग्रतेचा शोध शक्य

## डॉ. दिलीप चव्हाण; नाईट कॉलेजमध्ये राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरविद्याशाखीय अभ्यास ही जगभर प्रचलित व मान्यता पावलेली अभ्यास प्रणाली आहे. त्यामुळे भाषा आणि साहित्याचा अभ्यास आंतरविद्याशाखीय दृष्टीने केल्यास तो अधिक परिपूर्ण, समग्र व मूलगामी होईल, असे प्रतिपादन स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा, साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुलाचे प्रमुख डॉ. दिलीप चव्हाण यांनी केले.



**कोल्हापूर : नाईट कॉलेजमध्ये आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. दिलीप चव्हाण. व्यासपीठावर रजनीताई मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, अॅड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, प्रा. डॉ. अरुण शिंदे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

शिवाजी विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि मराठी विभाग, नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित 'भाषा आणि साहित्य अभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक व बीजभाषक म्हणून ते बोलत होते. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम होत्या. याप्रसंगी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे संचालक अॅड. अमित बाडकर, 'शिविम'चे अध्यक्ष डॉ. भरत जाधव, सचिव डॉ. मंतेश हिरेमठ, अधिवेशनाध्यक्ष डॉ. गोपाळ गावडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, प्रा. डॉ. अरुण शिंदे, डॉ. नंदकुमार कुंभार आदी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. उदय पाटील, डॉ. अवनिश पाटील, डॉ. शरद भुताडिया, डॉ. माया पंडित यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ज्ञानेश्वर बंडगर, संपत देसाई, श्रीराम मोहिते आदी उपस्थित होते.

19 MAR 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur
Mob.- 9175089609

# स्थानिक गरजा लक्षात घेऊन संशोधन व्हावे : सिद्धार्थ शिंदे




कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):

संशोधकांनी स्थानिक गरजा लक्षात घेऊन त्यांची पूर्ती करण्याच्या दिशेने आपले संशोधन केंद्रित करावे. त्याचप्रमाणे शाश्वत विकास डोळ्यांसमोर ठेवून आपली सृजनशीलता वापरावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम-उषा) संशोधक व पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सृजनात्मक विचारांची शिक्षण पद्धती' या विषयावर आजपासून दोनदिवसीय कार्यशाळेस प्रारंभ झाला. उद्घाटन समरंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शिंदे बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.

श्री. शिंदे म्हणाले, समाजाचा पैसा समाजोपयोगी संशोधनासाठी खर्च व्हावा. विद्यापीठासारख्या ठिकाणी स्थानिक समस्यांवर आधारित संशोधन व्हावे. स्थानिक गरजांनुरुप अभ्यासक्रमांमध्ये देखील त्याचा अंतर्भाव व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. डॉ. महाजन अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, शिक्षकांमध्ये सृजनशील विचारसरणी असेल तर तो विद्यार्थ्यांसाठी, उद्यमशील समाजासाठी प्रेरणादायी ठरतो. आज शिक्षणक्षेत्रावर ही सृजनशीलता घडविण्याची मोठी जबाबदारी आहे.

यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत केले. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाचे समन्वयक डॉ विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील व अंजली आंबेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. रूपाली संकपाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सारिका पाटील, श्रीराम सोनवणे, आनंदा कुंभार, अर्चना कुराडे, अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, ममता घोटल, संजय चव्हाण, अतुल जाधव उपस्थित होते. विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील एकूण ८१ संशोधक व पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.

19 MAR 2025

महा न्यूज अँड व्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road
Front of Nirmit Corner Appartment, Kolhapur
Mob- 9175089609

# महिलांची गृहकामाची 'सेकंड शिफ्ट' संपुष्टात येईल तोच खरा महिलादिन : के. मंजुलक्ष्मी



कोल्हापूर ( महान्यूज अँड व्यूज):

कष्टकरी व नोकरदार महिलांची गृहकामाची सेकंड शिफ्ट संपुष्टात येईल, त्यावेळी खऱ्या अर्थाने महिलादिन साजरा होईल, असे प्रतिपादन कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे शरण साहित्य अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या समारोप समारंभाच्या प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. यावेळी म न्यवरांच्या हस्ते स्त्रीस्वातंत्र्याचे विचारपुष्प बंधमुक्त करून स्त्रियांची विविध सामाजिक, कौटुंबिक जोखडातून मुक्तता करण्याचा प्रतीकात्मक संदेश देण्यात आला.

श्रीमती मंजुलक्ष्मी म्हणाल्या, महिला दिनानिमित्त स्त्रीच्या बहुआयामी कार्याचा गौरव करून उत्सव साजरा केला जातो. प्रत्यक्षात मात्र नित्याच्या जीवनात कुटुंब आणि गृहसंगोपनाची जबाबदारी एकट्या महिलेला आपली नोकरी अथवा काम सांभाळत पार पाडावी लागते. कष्टकरी अथवा नोकरदार महिलांची गृहकामाची सेकंड शिफ्ट संपुष्टात येऊन घरातील स्त्री-पुरुष मिळून सामाजिक आणि गृहसंगोपनाची जबाबदारी एकत्रित पार पाडतील तेव्हा खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होईल.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, स्त्री-पुरुष भेदभाव निर्मूलनाची सुरवात आपल्या घरापासूनच व्हायला हवी. शिवाजी विद्यापीठाच्या



विद्यार्थिनी शिक्षणासह सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. विषम सामाजिक पार्श्वभूमीवर देखील शैक्षणिक क्षेत्रातील स्त्रियांचे संख्यात्मक आणि गुणवत्तात्मक वाढते प्रमाण हे आश्वासक चित्र असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेचा मुख्य विषय 'भारतीय महिला: जात-वर्ग-लिंगभाव जाणिवा' असा होता. प्रथम सत्रात स्त्रीवादी साहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ. माया पंडित यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिलांच्या वर्तमान स्थितीचे आंतरराष्ट्रीय निर्देशांकाद्वारे विस्तृत वर्णन केले. त्यानंतर कन्नड साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखिका प्रा. डॉ. शिवगंगा रुम्मा यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. बाराव्या शतकात निर्माण झालेली शरण चळवळ ही केवळ भक्तीपंथ नसून ती जात-वर्ग-लिंगभेदरहित समताधिष्ठित समाज निर्मितीची समग्र चळवळ असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया यांनी महिलांविषयक निवडक आंतरराष्ट्रीय लघुपटांचे प्रदर्शन करून त्यावर चर्चा घडवून आणली. यामध्ये उमेश मालन दिग्दर्शित 'गोल्डन टॉयलेट' हा मराठी लघुपट, फजिल रझाक दिग्दर्शित 'पिरा' हा मल्याळम लघुपट तसेच समता जाधव दिग्दर्शित 'सोच सही, मर्द वही' हा हिंदी लघुपट दाखविण्यात आला.

या एकदिवसीय कार्यशाळेसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वीसहून अधिक महाविद्यालयांतील 150 विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकांनी सहभाग नोंदविला. डॉ. चैत्रा राजाज्ञा यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. वैष्णवी पोतदार व मानसी बोलूरे यांनी सूत्रसंचालन केले. अँड. अंकिता त्रिभुवने यांनी आभार मानले.

कार्यशाळेस व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, अधिसभा सदस्य अँड. अभिषेक मिठारी व अँड. अजित पाटील, डॉ. आण्णासाहेब गुरव, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. नितीन माळी, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. दिलीप माळी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपुरकर, सरला पाटील, राजशेखर तंबाके, बसवराज आजरी, प्रा. सुभाष महाजन, प्रा. अशोक विभुते, प्रा. कल्याणराव पुजारी, विलास आंबोळे, चंद्रशेखर बटकडली, सरपंच शुभांगी पाटील, राजश्री काकडे, उमेश सूर्यवंशी, रेश्मा खाडे सुरेश जांबुरे, विजय पाटील, विभावरी नकाते, कैवल्य शिंदे यांच्यासह विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

19 MAR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# महिलांची गृहकामाची 'सेकंड शिफ्ट' संपुष्टात येईल तोच खरा महिलादिन

## प्रशासक के. मंजुलक्ष्मी; शरण साहित्य अध्यासन कार्यशाळा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कष्टकरी व नोकरदार महिलांची गृहकामाची सेकंड शिफ्ट संपुष्टात येईल, त्यावेळी खऱ्याअर्थाने महिलादिन साजरा होईल, असे प्रतिपादन महानगरपालिकेच्या प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे शरण साहित्य अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या समारोप समारंभाच्या प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत बोलताना प्रशासक के. मंजुलक्ष्मी. व्यासपीठावर अजित पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. तृप्ती करेकट्टी व अॅड. अभिषेक मिठारी. (छाया : नाज ट्रेनर)

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्त्री-पुरुष भेदभाव निर्मूलनाची सुरुवात आपल्या घरापासूनच व्हायला हवी, असे मत व्यक्त केले. प्रथम सत्रात स्त्रीवादी साहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ. माया पंडित यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिलांच्या वर्तमान स्थितीचे आंतरराष्ट्रीय निर्देशांकाद्वारे वर्णन केले. कन्नड साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका प्रा. डॉ. शिवगंगा रुम्मा यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया यांनी महिलांविषयक निवडक आंतरराष्ट्रीय लघुपटांचे प्रदर्शन करून त्यावर चर्चा घडवून आणली. डॉ. चैत्रा राजाज्ञा यांनी स्वागत केले. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. वैष्णवी पोतदार व मानसी बोलुरे यांनी सूत्रसंचालन केले. अॅड. अंकिता त्रिभुवने यांनी आभार मानले.

यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, अधिसभा सदस्य अॅड. अभिषेक मिठारी व अॅड. अजित पाटील, डॉ. अण्णासाहेब गुरव, डॉ. राजेंद्र सोनकवडे, सुरेश शिपूरकर, सरला पाटील उपस्थित होते.

19 MAR 2025 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मान्सून संशोधन महत्त्वाचे - डॉ. सुनील पवार

## शिवाजी विद्यापीठात 'हवामान बदलावर कार्यशाळा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** भारतीय उपखंडाच्या दृष्टीने मोसमी वारे आणि मोसमी पावसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वाधिक महत्त्वाचा स्रोत आहे. हवामान बदलाचे परिणाम भारतीय मान्सूनवरही होत आहेत. त्याविषयी अभ्यास आणि संशोधन महत्त्वाचे ठरते, असे प्रतिपादन पुण्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीचे वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. सुनील पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात 'हवामान बदल आणि भारतीय मान्सून' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल आणि शाश्वत केंद्र, पर्यावरण शास्त्र विभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले होते. शिवाजी विद्यापीठ आणि आय.आय.टी.एम. यांच्या दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत चांगले काम सुरू असल्याचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी अध्यक्षीय मनोगतात सांगितले. डॉ. दादा नाडे प्रमुख उपस्थित होते. डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले, डॉ. आसावरी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर डॉ. शशीभूषण महाडिक यांनी आभार मानले. विविध सत्रांत आयआयटीएमचे प्रसिद्ध हवामानशास्त्रज्ञ डॉ. हाफजा वरिकोडण, डॉ. सुरज के.पी. आणि डॉ. प्रशांत पिल्लई यांनी मान्सूनवरील हवामान बदलाचा प्रभाव, संभाव्य परिणाम आणि त्यावरील वैज्ञानिक उपाययोजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

19 MAR 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्यापासून 'डिजिटल मीडिया उद्योग : नवे प्रवाह' कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठातील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत 'डिजिटल मीडिया उद्योग : नवे प्रवाह' या विषयावर उद्या, गुरुवारपासून दोनदिवसीय कार्यशाळा होणार आहे.

मास कम्युनिकेशन विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये गुरुवारी सकाळी दहा वाजता या कार्यशाळेचे उद्‌घाटन ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार डॉ. दशरथ पारेकर असतील. उदघाटनानंतर डॉ. राजेंद्र पारिजात (विषय - 'डिजिटल जाहिराती व डिजिटल मार्केटिंग), 'सकाळ'च्या पुणे आवृत्तीचे वृत्तसंपादक धनंजय बिजले (डिजिटल माध्यमांचा प्रिंट मिडियातील वापर), सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील प्रा. योगेश बोराटे (डिजिटल माध्यमातील नव्या संधी), सायबर ज्युरिक्सचे अध्यक्ष आर. विनायक (डिजिटल माध्यमातील रोजगार संधी) मार्गदर्शन करतील.

दुसऱ्या दिवशी (शुक्रवारी) 'सकाळ'च्या कोल्हापूर आवृत्तीचे संपादक निखिल पंडितराव (वृत्तपत्रांवर डिजिटल माध्यमांचा परिणाम), बी न्यूजचे मुख्य संपादक चारुदत्त जोशी (टेलिव्हिजनमधील डिजिटल मिडियाचा वापर), चित्रपट दिग्दर्शक सुमित पाटील (चित्रपट उद्योगांमध्ये डिजिटल मीडियाचा वापर) मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी दिली. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर वानखेडे, डॉ. शिवाजी जाधव आहेत.

19 MAR 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डिजिटल मीडिया' बाबत उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम उषा) अंतर्गत, 'डिजिटल मीडिया उद्योग : नवे प्रवाह' या विषयावर दि. २० व २१ मार्च रोजी कार्यशाळा होत आहे. पत्रकारिता विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये कार्यशाळेचे उद्घाटन 'डिजिटल मीडिया उद्योग आणि डिजिटल संघटनेचे अध्यक्ष राजा माने यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार डॉ. दशरथ पारेकर असणार आहेत. ही माहिती विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार यांनी दिली आहे. या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर वानखेडे, डॉ. शिवाजी जाधव आहेत. कार्यशाळेत डॉ. राजेंद्र पारिजात, धनंजय बिजले, योगेश बोराटे (पुणे विद्यापीठ), आर. विनायक, ज्येष्ठ पत्रकार चारुदत्त जोशी, निखिल पंडितराव, निर्माता-दिग्दर्शक सुमित पाटील यांची व्याख्याने होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2025
लोकमत

# विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** विद्यापीठातील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने 'डिजिटल मीडिया उद्योग : नवे प्रवाह' या विषयावर गुरुवारी (दि. २०) व शुक्रवारी दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी १० ते ५ या कालावधीत ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेसाठी मोफत नोंदणी असून, सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी दिली. या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर वानखेडे व डॉ. शिवाजी जाधव आहेत.

19 MAR 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road
Front of Nirmit Corner Appartment, Kolhapur
Mob.- 9175089609

# 'डिजिटल मिडीया उद्योग: नवे प्रवाह' या विषयावर पत्रकारिता विभागात

## दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):

जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (इच णडकअ) अंतर्गत, 'डिजिटल मिडीया उद्योग: नवे प्रवाह' या विषयावर दि. २०-२१ मार्च २०२५, दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी १०.०० ते ५.०० या कालावधीत करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन 'डिजिटल मिडीया उद्योग आणि डिजिटल संघटनचे अध्यक्ष आणि जेष्ठ संपादक, राजा माने यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ संपादक डॉ. दशरथ पारेकर असणार आहेत. या कार्यशाळेचे आयोजन पत्रकारिता व मास कम्युनिकेशन या विषयाचे विद्यार्थी यांच्यासाठी करण्यात आलेले आहे. या कार्यशाळेसाठी मोफत नोंदणी असून, सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे अशी माहिती विभागाच्या प्रमुख प्रा.डॉ.निशा पवार यांनी दिली आहे.

या कार्यशाळेचे समन्वयक, डॉ.चंद्रशेखर वानखेडे व डॉ.शिवाजी जाधव आहेत.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी डॉ.राजेंद्र पारिजात, 'डिजिटल जाहिराती व डिजिटल मार्केटींग' या विषयावर, धनंजय बिजले (सकाळ, पुणे), 'डिजिटल माध्यमांचा प्रिंट मिडियातील वापर' या विषयावर, योगेश बोराटे (पुणे विद्यापीठ) 'डिजिटल माध्यमातील नव्या संधी', सायबर ज्युरिक्सचे अध्यक्ष, आर, विनायक, यांचे 'डिजिटल माध्यमातील रोजगार संधी' या विषयांवर मार्गदर्शन होणार आहे.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी बी न्यूज चे मुख्य संपादक, चारुदत्त जोशी, 'टेलिव्हिजनमधील डिजिटल मिडियाचा वापर' या विषयावर तर सकाळ, कोल्हापूर आवृत्तीचे, निवासी संपादक, निखिल पंडीतराव, 'वृत्तपत्रांवर डिजिटल माध्यमांचा परिणाम' या विषयावर, मराठी चित्रपट निर्माता-दिग्दर्शक, सुमित पाटील यांचे 'चित्रपट उद्योगामध्ये डिजिटल मिडीयाचा वापर' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

19 MAR 2025 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा बसवेश्वरच्या वचनसाहित्यात स्वाभिमानपूर्वक जगण्याचा संदेश

■ डॉ. मांतेश हिरेमठ यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा बसवेश्वर यांचे वचनसाहित्य माणसाला निर्भिड आणि स्वाभिमानपूर्वक जगण्याचा संदेश देतात, असे प्रतिपादन डॉ. मांतेश हिरेमठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासन आयोजित श्री. रघुनाथ स्वामी आनंदमूर्ती व्याख्यानमालेअंतर्गत 'क्रांतिकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर यांचे वचनसाहित्य' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रणधीर शिंदे होते.

डॉ. हिरेमठ म्हणाले, महात्मा बसवेश्वर यांचे वचनसाहित्य वाचकाला अंतर्मुख करते. बसवेश्वर जातीव्यवस्थेवर कडक प्रहार करतात. वचनसाहित्यातून वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर भाष्य त्यांनी केले आहे. वचनसाहित्यात लोकभाषेचा पुरस्कार केलेला पाहावयास मिळतो.

डॉ. रणधीर शिंदे म्हणाले की, बसवेश्वरांचे वचनसाहित्य भारतीय साहित्यामधील एक अनमोल दागिना आहे. समाजप्रबोधनासाठी वचनसाहित्य महत्त्वाचे ठरते. त्यामुळे त्यांचे महत्त्व अधोरेखित होते. संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. रूपाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर वनिता

19 MAR 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur
Mob - 9175089609

# महात्मा बसवेश्वर यांच्या वचनसाहित्यात स्वाभिमानपूर्वक जगण्याचा संदेश : डॉ. मांतेश हिरेमठ

कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):

महात्मा बसवेश्वर यांचे वचनसाहित्य माणसाला निर्भिड आणि स्वाभिमानपूर्वक जगण्याचा संदेश देतात, असे प्रतिपादन डॉ. मांतेश हिरेमठ यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासन आयोजित श्री रघुनाथ स्वामी आनंदमूर्ती व्याख्यानमालेअंतर्गत 'क्रांतिकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर यांचे वचनसाहित्य' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रणधीर शिंदे होते.

डॉ. हिरेमठ म्हणाले, महात्मा बसवेश्वर



यांचे वचनसाहित्य वाचकाला अंतर्मुख करते. बसवेश्वर जातीव्यवस्थेवर कडक प्रहार करतात. वचनसाहित्यातून वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर भाष्य त्यांनी केले आहे. वचनसाहित्यात लोकभाषेचा पुरस्कार केलेला पाहावयास मिळतो.

डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षीय मनोगतात म्हणाले की, बसवेश्वरांचे वचनसाहित्य भारतीय साहित्यामधील एक अनमोल दागिना आहे. समाजप्रबोधनासाठी वचनसाहित्य महत्त्वाचे ठरते. त्यामुळे त्यांचे महत्त्व अधोरेखित होते.

संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. रूपाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर वनिता पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. अनिल गवळी, अनमोल कोठाडिया, डॉ.सुखदेव एकल, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

19 MAR 2025 तरूण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेत झाले विद्यार्थी हिताचे निर्णय

## विद्यापीठाच्या अधिसभेत १८ ठराव मंजूर : ६०० कोटींमधून शिक्षण, संशोधनाला चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा म्हटले की गोंधळ आणि सभात्याग ठरलेला असतो. परंतु शनिवारी झालेल्या अधिसभेत गेल्या दोन दशकात जेवढे ठराव मंजूर नाहीत, तेवढे १८ ठराव मंजूर झाले, ही विद्यापीठ विकासासाठी पूरक गोष्ट आहे. अधिसभा सदस्यांचे ठराव अनेकदा काना, मात्रा किंवा अभ्यास न करता मांडल्याने मागे घेतल्याची उदाहरणे आहेत. परंतु शनिवारच्या अधिसभेत पहिल्यांदाच सदस्यांनी अभ्यास करून ठराव मांडले. अंदाजपत्रकातील ६०० कोटींची तरतूद ही गोष्ट विद्यार्थी, विद्यापीठ विकासाला चालना देणारी आहे.

तरुण भारत विद्यापीठातून

अधिसभा सदस्यांनी 'आमचे विद्यापीठ शिवाजी विद्यापीठ' असे टी शर्ट परिधान करूनच सभागृहात प्रवेश केला. सुरूवातीलाच नामविस्ताराला विरोध असल्याचा स्थगन प्रस्ताव ॲड मिठारी यांनी मांडला. याला सर्व असदस्यांनी पाठींबा दर्शवला. सभागृहाचे एकमत पाहून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना चर्चेविना हा प्रस्ताव स्विकारला, ही एकीची ताकदच म्हणावी लागेल.

अधिसभा सदस्यांच्या गोंधळामुळे पाचच प्रश्नावर प्रश्नोत्तराचा तास संपला. परंतु सदस्यांनी मांडलेले १८ ठराव मान्य केल्याने सदस्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. डॉ. प्रकाश कुंभार यांनी बंद होण्याच्या मार्गावर असलेले कौशल्य संवर्धन, व्यावसायिक अभ्यासक्रम, मुक्त निवड या नवीन अभ्यासक्रमांची निर्मिती, अध्यापन कसे करायचे, याबाबत प्रशिक्षण द्यावे, हा ठराव मंजूर झाला. हा ठराव विद्यार्थी हिताच्या दृष्टीने महत्वाचा मानला जात असल्यामुळे डॉ. कुंभार यांचे विद्यापीठ प्रशासनाकडूनही कौतुक होत आहे.

अंदाजपत्रकात शिक्षण आणि संशोधनासाठी १२ कोटीची तरतूद करून विद्यार्थ्यांना एक प्रकारे न्यायच दिला आहे. शिक्षण, संशोधन विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे असले तरी संशोधन करणाऱ्यांना प्राथमिक सोयी-सुविधा देण्यासाठीही मोठ्या प्रमाणात तरतूद केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी २ कोटी १६ लाखांची तरतूद केली आहे. या धोरणाची अंमलबजावणी करत असताना विद्यार्थी संख्येत होणारी घट लक्षात घेतली पाहिजे. कारण अध्यापनावर लाखो रूपये खर्च करून पाच ते दहाच विद्यार्थी संबंधीत विषयाचा अभ्यास करणार असतील तर ते परवडण्यासारखे नाही, असे अधिसभा सदस्यांचे मत आहे.

अधिसभेतील काही सदस्यांच्या गोंधळामुळे सभागृहाचा नाहक वेळ वाया जातो. काही सदस्यांच्या स्टंटबाजीमुळे सभागृहाचा मुख्य उद्देश बाजूला पडतो. तब्बल ११ तास सुरू असलेल्या सभागृहातून हाती काहीच लागत नाही. मग चर्चा कशासाठी याचे तारतम्य सदस्यांनी ठेवले पाहिजे, असे शिक्षण तज्ज्ञांचे मत आहे.



### अंदाजपत्रकात तरतूद पण...

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे महाविद्यालय स्वायत्त होत असल्याने विद्यापीठातील अधिविभागात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत आहे. महाविद्यालयामध्ये नवीन अभ्यासक्रमांना मान्यता हे देखील विद्यार्थ्यांच्या घटणाऱ्या संख्येचे मुख्य कारण आहे. विद्यार्थी संख्या वाढीसाठी समिती नेमली असली तरी काहीतरी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. विद्यार्थीच नसतील तर अभ्यासक्रम करून काय करायचे, असा सवाल सदस्यांनी केला.

### फक्त संशोधनासाठी तरतूद

| | |
|---|---|
| शैक्षणिक व संशोधन<br>३ कोटी २ लाख | संशोधन<br>२ कोटी २५ लाख |
| विकसित संगणक प्रणाली<br>२ कोटी ६३ लाख | पीएम उषा योजनेसाठी<br>७ कोटी ४७ लाख |
| संशोधन उपकरणे खरेदीसाठी<br>५ कोटी ७७ लाख | ग्रंथालय<br>९९ लाख ६२ हजार |
| कौशल्य संवर्धन<br>३ लाख ५० हजार | इंडस्ट्री इन्टेक्शन सेल<br>१० लाख २५ हजार |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सकाळ
19 MAR 2025




कोल्हापूर : सर धनजीशा बोमनजी कूपर पारितोषिकाचे प्रथम मानकरी किरण विजय मुसळे आणि सूरज राजेंद्र गवळी यांना पारितोषिक वितरण डॉ. नितीन देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

# समाजाला माहिती नसलेल्या इतिहासपुरुषांविषयी संशोधन करा

## डॉ. देशपांडे; सर धनजिशा कूपर पारितोषिक वितरण

कोल्हापूर, ता. १८ : अनेक महामानव असे आहेत की, ज्यांचा इतिहास सर्वार्थाने समाजासमोर आलेला नाही. इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी अशा समाजाला माहिती नसलेल्या इतिहासपुरुषांविषयी संशोधन करावे, असे आवाहन साताऱ्याच्या कूपर उद्योग समूहाचे मुख्य मानव संसाधन अधिकारी डॉ. नितीन देशपांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागासाठी स्थापित 'सर धनजिशा बोमनजी कूपर पारितोषिकांच्या वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सर धनजिशा कूपर हे राजकारणविरहित व्यापार आणि व्यापार विरहित राजकारण करणारे व्यक्तिमत्त्व होते. राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून ते कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी त्यांचे दृढ संबंध होते. त्यांच्या नावे हा पुरस्कार सुरू होत आहे, याचा आनंद आहे.

इतिहास अधिविभागात २०२३-२४मध्ये विद्यार्थ्यांत सर्वाधिक गुण मिळवलेल्या सूरज राजेंद्र गवळी आणि विद्यार्थिनींत सर्वाधिक गुण मिळवलेल्या किरण विजय मुसळे यांना पारितोषिके प्रदान केली. अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. वर्षा पांढरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्ता मचाले यांनी आभार मानले.

### संशोधन प्रकल्पासाठी बारा लाख

सातारा येथील कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. कंपनीकडून सर धनजिशा बोमनजी कूपर यांच्या जीवन व कार्याविषयी संशोधन प्रकल्पासाठी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागास १२ लाख २७ हजार रुपये सामाजिक दायित्व निधी दिला आहे. सर धनजिशा कूपर यांच्या स्मरणार्थ इतिहास विषयात सर्वाधिक गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या पारितोषिकासाठी स्थापित करण्यासाठी ७ लाख रुपयांचा निधीही दिला.

19 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अज्ञात इतिहास पुरुषांविषयी संशोधन करा

## देशपांडे : धनजीशा बोमनजी कूपर पारितोषिकाचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील सर धनजीशा बोमनजी कूपर पारितोषिकाचे प्रथम मानकरी किरण मुसळे व सूरज राजेंद्र गवळी यांना डॉ. नितीन देशपांडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण केले. यावेळी कुलगुरू डी. टी. शिर्के उपस्थित होते.

**कोल्हापूर :** अनेक महामानव असे आहेत की ज्यांचा इतिहास सर्वार्थाने समाजासमोर आलेला नाही. इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी अशा इतिहास पुरुषांविषयी संशोधन करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन सातान्याच्या कूपर उद्योग समूहाचे मुख्य मानव संसाधन अधिकारी डॉ. नितीन देशपांडे यांनी मंगळवारी केले.

कूपर उद्योग समूहाच्या देणगी निधीमधून शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागासाठी स्थापित 'सर धनजीशा बोमनजी कूपर पारितोषिक (२०२३-२४)' या पारितोषिकांचा प्रथम वितरण सोहळा राजर्षी शाहू संशोधन सभागृहात झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी इतिहास अधिविभागात सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या सूरज राजेंद्र गवळी आणि विद्यार्थिनींत सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या किरण विजय मुसळे यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान केली. डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. वर्षा पांढरे यांनी सूत्रसंचालन केले.

**१२**
लाख रुपयांचा निधी इतिहास विभागास देण्यात आला आहे.

### काय आहे पारितोषिक

सातारा येथील कूपर कॉर्पोरेशनकडून सर धनजीशा बोमनजी कूपर यांच्या जीवन व कार्याविषयी संशोधन प्रकल्पासाठी इतिहास अधिविभागास १२ लाख २७ हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे. सर धनजीशा कूपर यांच्या स्मरणार्थ इतिहास विषयात सर्वाधिक गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी दोन पारितोषिके स्थापित करण्यासाठी ७ लाख रुपयांचा निधीही दिला आहे.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2025

Times of India

# SUK hosts workshop for LGBTQAI

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Vice Chancellor of Shivaji University Kolhapur Dr Digambar Shirke on Tuesday emphasized the importance of recognizing the 'LGBTQAI' community as an integral part of society.

Addressing a one-day awareness workshop on the LGBTQAI community, Dr. Shirke asserted that the lives of LGBTQAI individuals should be respected and freed from discrimination.

The workshop, held at the Humanities Hall of the University, was organized in collaboration with Shivaji University's Shardabai Govindrao Pawar Adhyasan, Abhiman NGO (Kolhapur), and Muskan NGO (Sangli).

Dr. Shirke told the audience, "This workshop should be seen as social work. We should aim to do justice to this community. We must make an effort to understand this community. Attitudes need to change, and steps must be taken to address their challenges."

Special guests at the event included Meena Seshu, founder of Muskan NGO, and Vishal Pinjani of Abhiman NGO.

19 MAR 2025 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एलजीबीटीक्युएआय' समुदायाला सन्मान द्या

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत पूर्वा, प्रिन्स, स्मिता, डॉ. भारती पाटील, मीना शेषू, विशाल पिंजानी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

'एलजीबीटीक्युएआय' हा समुदाय आपल्या समाजातील एक घटकच आहे, याची सर्वांना जाणीव होणे आवश्यक आहे. कोणताही भेदभाव न करता त्यांचे जीवन समानतेचे आणि सन्मानाचे असले पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, अभिमान, कोल्हापूर आणि मुस्कान, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये 'एलजीबीटीक्यूएआय' समुदायाविषयी एकदिवसीय जागृतीपर कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या कार्यशाळेकडे सामाजिक कार्य म्हणून पाहिले पाहिजे. या समुदायास न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता आली तरी निसर्गाचे आकलन कोणाला शक्य नाही. त्यामुळे आपणच या समुदायाला समजून घेतले पाहिजे. दृष्टीकोन बदलला पाहिजे आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

समानता आणि सर्वांची प्रतिष्ठा हा संविधानाने प्रदान केलेला अधिकार सर्वांना आहे. मीना शेषू म्हणाल्या, लिंगभाव हा केवळ जैविक नाही, तर तो समाज आणि संस्कृतीने तयार केलेला आहे. मुलांना समाजाबरोबर बाहेर जाऊन शिकण्याची आणि माणूस म्हणून तयार होण्याची संधी मिळते आणि मुलींना घरात बसविले जाते.

विशाल पिंजानी म्हणाले, या समुदायातील लोकांचे आयुष्य वाचविण्याची संधी तुमच्या हातात आहे. योग्य माहितीअभावी या लोकांबद्दल गैरसमज निर्माण होवून द्वेष, हिंसा आणि अत्याचार घडतात. लोकांमध्ये यांच्याप्रती जागृती निर्माण होणे गरजेचे आहे. या लोकांना व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. छोट्या प्रयत्नांमुळे त्यांचे जीवन सुधारू शकते.

अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. ऊर्मिला दशवंत यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मेघा पानसरे, डॉ. उमेश गडेकर, डॉ. परशुराम वडर, डॉ. सोनिया रजपूत, डॉ. सुरेश आपटे, एलजीबीटीक्यूएआय समुदायातील प्रिन्स, सँडी, यशश्री, सना, पूर्वा, मयुरी आदी उपस्थित होते.

19 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात आयोजित 'एलजीबीटीक्यएआय'विषयक जागृतीपर कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, पूर्वा, प्रिन्स, स्मिता, डॉ. भारती पाटील, मीना शेषू, विशाल पिंजानी आदी उपस्थित होते.

# 'एलजीबीटीक्यूएआय' समुदायाला समता, सन्मानाचा अधिकार : डॉ. शिर्के

## शिवाजी विद्यापीठात जागृतीपर कार्यशाळेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'एलजीबीटीक्यूएआय' हा समुदाय आपल्या समाजातील एक घटकच आहे, याची सर्वांना जाणीव होणे आवश्यक आहे. कोणताही भेदभाव न करता त्यांचे जीवन समानतेचे आणि सन्मानाचे असले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी केले.

विद्यापीठाचे शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, अभिमान, कोल्हापूर आणि मुस्कान, सांगली यांच्या वतीने मानव्यशास्त्र सभागृहामध्ये 'एलजीबीटीक्यूएआय' समुदायाविषयी एकदिवसीय जागृतीपर कार्यशाळा झाली. यावेळी 'मुस्कान'च्या मीना शेषू, 'अभिमान'च्या विशाल पिंजानी यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी मीना शेषू म्हणाल्या, लिंगभाव हा केवळ जैविक नाही, तर तो समाज आणि संस्कृतीने तयार केलेला आहे. मुलांना समाजाबरोबर बाहेर जाऊन शिकण्याची आणि माणूस म्हणून तयार होण्याची संधी मिळते आणि मुलींना घरात बसविले जाते. हा समुदाय आणि समाजामध्ये सेतू बांधण्याचे काम, असे उपक्रम करतात. सर्वांना सन्मानाने जगण्याचा हक्क आहे. तो या समुदायासाठीही मान्य व्हायला हवा. विशाल पिंजानी म्हणाले, लोकांमध्ये या समुदायाप्रति जागृती निर्माण होणे गरजेचे आहे. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. ऊर्मिला दशवंत यांनी आभार मानले. डॉ. मेघा पानसरे, डॉ. उमेश गडेकर, डॉ. परशुराम वडर, डॉ. सोनिया रजपूत, डॉ. सुरेश आपटे, एलजीबीटीक्यूएआय समुदायातील प्रिन्स, सँडी, यशश्री, सना, पूर्वा, मयुरी उपस्थित होते.

> हा समुदाय आपल्या समाजातील एक घटक आहे याची सर्वांना जाणीव होणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAR 2025
सकाळ

# ‘एलजीबीटीक्यूएआय’ समुदायाला देऊ सन्मान

## कुलगुरू शिर्के, विद्यापीठात कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १८ : एलजीबीटीक्यूएआय’ हा समुदाय समाजातील एक घटकच आहे, याची सर्वांना जाणीव होणे आवश्यक आहे. भेदभाव न करता त्यांचे जीवन समानतेचे आणि सन्मानाचे असले पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे व्यक्त केले.

विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, अभिमान (कोल्हापूर) आणि मुस्कान (सांगली) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये ‘एलजीबीटीक्यूएआय’ समुदायाविषयी एकदिवसीय जागृतीपर कार्यशाळा झाली. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

ते म्हणाले, ‘आपणच या समुदायाला समजून घेतले पाहिजे. दृष्टिकोन बदलला पाहिजे आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. समानता आणि सर्वांची प्रतिष्ठा हा संविधानाने प्रदान केलेला अधिकार सर्वांना आहे, याची जाणीव जागृती करण्यामध्ये कार्यशाळा यशस्वी होईल.’

मीना शेषू यांनी सर्वांना सन्मानाने जगण्याचा हक्क आहे. तो या समुदायासाठीही मान्य व्हायला हवा, असे सांगितले. विशाल पिंजानी यांनी या समुदायाला सर्वत्र प्रवेश, समान वागणूक, आरोग्य आणि शांततामय जीवन जगण्याचा अधिकार त्यांना मिळाला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

डॉ. मेघा पानसरे, डॉ. उमेश गडेकर, डॉ. परशुराम वडर, डॉ. सोनिया रजपूत, डॉ. सुरेश आपटे, एलजीबीटीक्यूएआय समुदायातील प्रिन्स, सँडी, यशश्री, सना, पूर्वा, मयूरी आदी उपस्थित होते. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. उर्मिला दशवंत यांनी आभार मानले.



कोल्हापूर : विद्यापीठातील कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर डॉ. भारती पाटील, विशाल पिंजानी, मीना शेषू.

19 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘एलजीबीटीक्यूएआय’ समुदायाला समता, सन्मानाचा अधिकार

## कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

‘एलजीबीटीक्यूएआय’ हा समुदाय आपल्या समाजातील एक घटकच आहे, याची जाणीव होणे आवश्यक आहे. भेदभाव न करता त्यांचे जीवन समानतेचे आणि सन्मानाचे असले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, अभिमान, कोल्हापूर आणि मुस्कान, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये ‘एलजीबीटीक्यूएआय’



**कोल्हापूर : ‘एलजीबीटीक्यूएआय’विषयक कार्यशाळेत बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.**

समुदायाविषयी एकदिवसीय जागृतीपर कार्यशाळा मंगळवारी झाली. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या कार्यशाळेकडे सामाजिक कार्य म्हणून पाहावे. या समुदायास न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या समुदायाला समजून घेतले पाहिजे. दृष्टिकोन बदलून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

मीना शेषू म्हणाल्या, लिंगभाव हा केवळ जैविक नाही, तर तो समाज आणि संस्कृतीने तयार केलेला आहे. मुलांना समाजाबरोबर बाहेर जाऊन शिकण्याची आणि माणूस म्हणून तयार होण्याची संधी मिळते आणि मुलींना घरात बसवले जाते. हा समुदाय आणि समाजामध्ये पूल बांधण्याचे काम असे उपक्रम करतात.

विशाल पिंजानी म्हणाले, या समुदायातील लोकांचे आयुष्य वाचवण्याची संधी तुमच्या हातात आहे. योग्य माहितीअभावी या लोकांबद्दल गैरसमज निर्माण होऊन द्वेष, हिंसा आणि अत्याचार घडतात. लोकांमध्ये यांच्याप्रती जागृती निर्माण होणे गरजेचे आहे.

अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. उर्मिला दशवंत यांनी आभार मानले. डॉ. मेघा पानसरे, डॉ. उमेश गडेकर, डॉ. परशुराम वडर, डॉ. सोनिया रजपूत, डॉ. सुरेश आपटे, एलजीबीटीक्यूएआय समुदायातील प्रिन्स, सँडी, यशश्री, सना, पूर्वा, मयुरी यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.